राज्यातील कृषि विद्यापीठांमधून शिक्षण
घेतलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे
साक्षांकित करण्याकरीता "नोडल
अधिकारी" नियुक्त करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
क्रमांक : कृपवि-३५१८/प्र.क्र.२६८/प्रशा-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : २७ जून, २०१८

## कार्यालयीन आदेश

राज्यातील कृषि विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे साक्षांकित करण्याची कार्यवाही कृषि विभागांतर्गत होणे अपेक्षित असल्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत कळविण्यात आले आहे. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाने साक्षांकनासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या धर्तीवर कृषि विभागाने स्वतंत्र मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे, विद्यार्थ्यांकडून भरावयाचे अर्ज शासकीय मुद्रणालयाकडून छपाई करुन घेणे, शैक्षणिक कागदपत्रे साक्षांकन करण्यासाठी शिक्क्यांचे नमुने तयार करुन घेणे इ. बाबींवर या विभागाकडून कार्यवाही करावयाची आहे.

२. उपरोक्त सर्व बाबी तसेच राज्यातील कृषि विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रमाणपत्रे साक्षांकित करण्याकरीता श्रीमती भा.दि.धुरी, कक्ष अधिकारी (६-अे) यांना "नोडल अधिकारी" म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

३. सदर आदेश मा.अपर मुख्य सचिव (कृषि) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु. सं. धपाटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

INWARD NO. 2642
DNS BRANCH
DR. B. S. KONKAN
KRISHI VIDYAPEETH,
DAPOLI, 2 JUL 2018

प्रति,
श्रीमती भा.दि.धुरी, कक्ष अधिकारी, कार्या.६-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रत,
कुलगुरु, कृषि विद्यापीठे (सर्व)
सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
सह सचिव (कृषि विद्यापीठे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती.



VC. Office
Registrar Office
1651